**<u>मुळ प्रतिवादी/ प्रतिदाव्यातील वादी तर्फे सा.क्र. ३ जिजाराम सांडू चव्हाण चा इ-प्रणाली द्वारे दाखल केलेल्या सरतपासावर उलट तपास शपथेवर मुळवादी तर्फे ॲड. एन.बी. सोनवणे यांचे मार्फत सुरु</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी माझ्या गावातील असल्याने मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, मला साक्षीसाठी न्यायालयामार्फत समन्स आले नव्हते. मी अवचितराव याने बोलावले म्हणून आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे शपथपत्र अवचितरावच्या सांगण्याप्रमाणे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुलोचना हीचे पती वाळूबा चव्हाण सन १९९० मध्ये आणि सासरे धोंडीबा चव्हाण सन २००७ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, सुलोचना यांना जगदीश नावाचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सासरे वारल्यानंतर वादीच्या घरात कर्ता पुरुष कोणी नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अवचितराव याने गट क्र. ४४० मधील २४ आर जमीनीचे खुलताबाद येथे रजिष्टर खरेदीखत करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये मी साक्षीदार नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, गहाणखत रजिष्ट्री आफीसला केले जात होते.
प्र. तुम्ही रजिष्ट्री ऑफीसला गेले होते का ?
उत्तर - व्यवहार गावात झाला होता. मी रजिष्ट्री ऑफीसला गेलो नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, खुलताबाद येथे रजिष्ट्री नोंदवतांना काय घडले हे मला माहित नाही. मी गट क्र. ४४० चा ७/१२ बघीतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला गट क्र. ४४० च्या ७/१२ उता-यावर किती लोकांची नावे आहेत सांगता येणार नाही. मी वादमिळकती बघीतलेली आहे. हे मला सांगता येणार नाही की, अवचितरावच्या मुलाने सुलोचनाबाईचा फेर होताना आक्षेप नोंदवला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुलोचनाबाईचे सासरे जिवंत असेपर्यंत प्रतिवादी अवचितराव याने दावा किंवा आक्षेप दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४४० मध्ये वादी सुलोचना हीचे नावे असलेल्या २४ आर जमीनी व्यतिरिक्त प्रतिवादी अवचितराव याच्या नावे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, किनगाव गावातून प्रतिवादी अवचितराव च्या व्यतिरिक्त इतर व्यक्तीने वादी सुलोचनाबाई ही सावकारकीचा व्यवसाय करते याबाबत तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४४० माझ्या समक्ष मोजणी करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ मधील मजकूर की वाद जमीनीपैकी ७ आर जमीन बोअरवेलसहीत आजही वादी याच्या ताब्यात आहे हा मजकूर मी अवचितराव याच्या सांगण्यावरुन शपथपत्रात नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार विश्वास दगडू चव्हाण व गंगाधर आनंदा चव्हाण यांनी अवचितराव व त्यांच्या मुलांना धमक्या दिल्या म्हणून पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, मला व्याजाचे पैसे परत दिल्याच्या तारखा निश्चित सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सुलोचनाबाई हीने अवचितराव व त्याच्या मुलांविरुध्द मनाई हुकुमाचा दावा दाखल केल्याची माहिती आहे.

प्र. सुलोचनाबाईने दावा दाखल करण्यापूर्वी तंटामुक्तीकडे बैठक घेतली होती ?
उत्तर – त्यावेळी मी पंढरपूर जि. सोलापूरला होतो.

९. मी किनगाव येथेच राहण्यास आहे. मी मागील ७ ते ८ महिन्यापासून पंढरपूरला राहतो. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, अवचितराव आणि वादी सुलोचनाबाई अथवा तिच्या सास-यामध्ये इतर व्यवहार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अवचितराव सोबत माझे चांगले संबंध असल्याने आजरोजी खोटी साक्ष दिली.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

**(धनंजय एस.देवरे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**
**दि.०५.०४.२०२४.**